लोकमत




कोल्हापुरात सोमवारी 'पुढारी'कार पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# शस्त्रसज्जतेसह दहशतवादाविरुद्ध मोठा लढा : भूषण गोखले

## ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला : 'दहशतवाद व भारत'वर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संरक्षण सेना नव्हे, तर सशस्त्र सेना म्हणून भारतीय सैन्यदल कार्यरत आहे. शस्त्र सज्जतेसह आक्रमक पवित्रा घेऊन भारताने दहशतवादाविरोधात मोठा लढा सुरु केला आहे, असे प्रतिपादन निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'दहशतवाद व भारत' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. शाहू स्मारक भवनमधील या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर 'दैनिक पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव प्रमुख उपस्थित होते.

### वायुसेनेची भूमिका महत्त्वाची

युद्धात वायूसेनेने महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये ही सेना महत्त्वपूर्ण काम करते. नागरी विमानसेवेमध्ये भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. त्या साधण्यासाठी सैन्यदल आणि नागरी विमान यांचा समावेश असणारे 'एरोस्पेस कमिशन' बनविण्याची गरज असल्याचे गोखले यांनी सांगितले.

### गोखले म्हणाले

- भ्रष्टाचार, इंटेलिजन्स फेल्युअर, आपल्यातील आपले शत्रू देशाला मिळालेले शाप
- जम्मू-काश्मीरमधील २२ पैकी ५ जिल्ह्यांमध्येच वाद.

भूषण गोखले म्हणाले, बदलते तंत्रज्ञान आत्मसात करून आपले सैन्यदल अधिकाधिक शस्त्रसज्ज होत आहे. अद्ययावत शस्त्रास्त्रे आणि ह्युमन इंटेलिजन्सच्या बळावर बालाकोट येथील 'सर्जिकल स्ट्राईक' यशस्वी झाला. प्रत्येक पंतप्रधानांनी विविध पद्धतीने पाकिस्तानकडे शांततेसाठी हात पुढे केला. मात्र, पाकिस्तानने दगा दिला आहे. त्यामुळे आता शत्रूंसमवेत तडजोड करायची नाही, अशी भूमिका भारताने घेतली आहे. या भूमिकेला बळ देण्यासाठी शासनव्यवस्था, समाज आणि सैन्यदल यांच्यात योग्य समन्वय, चांगले आकलन असणे आवश्यक आहे. कार्यक्रमास मेघना गोखले, अरुण नरके, बाबा सावंत, जयेश कदम, रत्नाकर पंडित, डॉ. निशा मुडे-पवार, आदी उपस्थित होते. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# डॉ. ग. गो. जाधव यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि.२०) कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागात हा कार्यक्रम झाला.

शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन कार्यरत आहे. अध्यासनाच्या वतीने 'पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम' अभ्यासक्रम सुरू आहे. कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी यावेळी अभ्यासक्रमाच्या प्रगतीविषयीची माहिती घेतली. यावेळी पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. रत्नाकर पंडित, पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या

पान २ वर ▸



**कोल्हापूर : 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. निशा पवार आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

# डॉ. ग. गो. जाधव यांना विद्यापीठात अभिवादन

(पान १ वरून) प्रमुख डॉ. निशा पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राच समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, अर्थशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक सुभाष कोंबडे, शशिकांत पंचगल्ले, डॉ. सुमेधा साळुंखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचे संकेतस्थळ नव्या रूपात

## दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था : ६० दिवसांत काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजना, आदींबाबतची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला नवे रूप देण्यात आले आहे. रंग-संगती, विविध शैक्षणिक संस्थांच्या लिंक्स, दिव्यांग विद्यार्थी आणि व्यक्तींसाठी विशेष सुविधा अशा स्वरूपातील बदल या नव्या स्वरूपात समाविष्ट करण्यात आले आहेत.

सप्टेंबरमध्ये विद्यापीठ हे 'नॅक' मूल्यांकनाला सामोरे जाणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ पातळीवर विविध बदल, शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे काम सुरू आहे. त्याअंतर्गत (www.unishivaji.ac.in) या संकेतस्थळाचा चेहरा-मोहरा बदलण्यात आला आहे. त्यामध्ये वापरकर्त्यांना (युझर) संकेतस्थळाच्या रंग-संगती निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नॅक मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर या संकेतस्थळावर क्वॉलिटी पोर्टल संकल्पना राबविली आहे. त्याअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक, एनआयआरएफ रँकिंग, जलयुक्त युनिव्हर्सिटी आदींच्या लिंक्स मुख्य पानावर दिल्या आहेत.

विद्यापीठाच्या विविध घटकांशी संबंधित आकडेवारी दिली आहे. सर्व माहिती मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. लक्षवेधक आणि वापरण्यास सोपे असे स्वरूप या संकेतस्थळाला देण्यात आले आहे. त्याचे काम प्रा. डॉ. आर. के. कामत, मिलिंद जोशी, स्वाती खराडे, के. एच. ओझा, कल्याण देवरूखकर यांचा समावेश असलेल्या समितीच्या निरीक्षणाखाली झाले आहे. जागतिक पातळीवरील 'डब्ल्यू थ्री सी' या निकषानुसार नव्या संकेतस्थळाची रचना केली आहे. ६० दिवसांत संकेतस्थळाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

### विश्लेषण करून नवी रचना



पूर्वीच्या संकेतस्थळावर माहिती आणि लिंक्स् यांची गर्दी झाली होती. त्यामुळे हे संकेतस्थळ किचकट वाटत होते. त्यावर बदल करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यानुसार समिती नेमून काम सुरु झाले. पहिल्यांदा जुन्या संकेतस्थळाचे विश्लेषण करण्यात आले. त्यात ज्या लिंक्सला अधिक वापरकर्त्यांनी भेट दिल्या, त्या नव्या संकेतस्थळावर मुख्य पानावर घेण्यात आल्या आहेत, अशी माहिती संकेतस्थळ निर्मिती समितीचे अध्यक्ष प्रा. आर. के. कामत यांनी दिली. ते म्हणाले, वापरण्यास सुलभ होईल अशा स्वरुपात या संकेतस्थळाची नव्याने रचना करण्यात आली आहे. चाचणी स्वरुपात संबंधित संकेतस्थळ कार्यान्वित केले आहे. त्याबाबत वापरकर्त्यांकडून सूचना मागवून घेतल्या आहे. या सूचना लक्षात घेऊन त्यानुसार आणखी काही बदल या संकेतस्थळामध्ये केले जाणार आहेत.

### स्क्रीन रीडर सुविधा

या संकेतस्थळात नव्याने 'स्क्रीन रीडर'ची सुविधा समाविष्ट करण्यात आली आहे. दिव्यांग विद्यार्थी, व्यक्तींसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग असलेल्या वापरकर्त्यांनी संकेतस्थळावर ज्याठिकाणी स्क्रीनवरील कर्सर जाईल, ते ऑडिओ स्वरुपात त्या वापरकर्त्याला समजणार आहे.